The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# मराठी संत कवयित्री -स्त्रीमुक्तीचा आत्मस्वर

सहा.प्रा.डॉ. सारिका अशोकराव बुरगे
मराठी विभाग प्रमुख,सरस्वती महाविद्यालय, केज

**प्रास्ताविक**

महाराष्ट्र हा संतांची भूमी म्हणून ओळखला जातो. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशात परंपरेत भक्ती आंदोलनाची महत्त्वाचे स्थान आहे. सर्वसामान्य माणसाला जात, धर्म, लिंग ,वर्ग, स्तर असे भेदभाव विसरून एकत्रित आणण्याचे कार्य भक्ती आंदोलनाने केले .भक्ती आंदोलनाचा प्रसार करण्यात नाथपंथ ,महानुभाव पंथ ,वारकरी संप्रदाय अशा विविध संप्रदायाची महत्त्वाची भूमिका आहे .भक्तीचा अधिकार नसलेल्या सर्वसामान्य माणसाला भक्तिमार्गात आणण्याचे कार्य या संप्रदायांनी साहित्याच्या माध्यमातून केले. बाराव्या- तेराव्या शतकातील महाराष्ट्रात महानुभाव पंथातील महादाईसा ,वारकरी पंथातील संत मुक्ताबाई ,संत कान्होपात्रा, संत जनाबाई ,संत तुकाराम शिष्या बहिणाबाई आपल्या भक्तीमुळे सर्वांपेक्षा वेगळ्या उठून दिसतात.

**संत परंपरेतील स्त्री**

**मुक्ताबाई**

वारकरी संप्रदायामध्ये ज्ञानदेव भगिनी मुक्ताबाईने वयाने लहान असूनही , "ताटी उघडा ज्ञानेश्वरा" म्हणून साद घलताना "विश्व झालीया वन्ही । संतमुखे व्हावे पाणी।" असा प्रेमळ तरी कणखर अधिकारवाणीने तिने उपदेश केला होता." १ नामदेवांचे, " अखंड जयाला देवाचा शेजार कारे अहंकार नाही गेला" २ म्हणून गर्वहरण केले. योगमार्गातील चांगदेवांची गुरु म्हणून ती अधिकारिणी झाली. आपल्या भक्तीने व कर्तृत्वाने तिने वारकरी पंथपरंपरेत महत्त्वाचे स्थान मिळवले.
ती ज्ञानमार्गाची कास धरणारी स्वयंसिध्दा होती.

"आप आपणा शोधुन घ्यावे |
विवेक नांदे त्यांच्या सवे || " ३

असा आत्मशोधाचा मूलमंत्र देण्याची धमक आणि विनम्रता ही तिच्यात होती .'स्व'ला जाणण्यावर 'स्व'ला पारखण्यावर मुक्ताई चा भर होता .नामदेव. चांगदेव आणि विसोबा खेचर यांचे प्रबोधन करून त्यांना गुरुमार्ग दाखवणारी मुक्ताई ही आजही एकविसाव्या शतकात अभिमान वाटावा अशी स्त्री आहे तिचे मोठेपण हे ज्ञानावर आधारित असल्याने स्त्री - पुरुष भेदा पलीकडचे होते.

**जनाबाई**

" मुक्ताबाईच्या जगण्यातून व काव्यातून येणारी तिची प्रतिमा ही तडफदार ,स्पष्टवक्त्या 'ज्ञानी' स्त्रीची येते म्हणून की काय तिच्या कवितेतून तत्कालीन सामाजिक संदर्भ येत नाहीत स्त्री जीवनाचे संदर्भ येत नाहीत. " ४ याउलट दैनंदिन जीवनातील काबाडकष्ट करणाऱ्या जनाबाईंची अभिव्यक्ती स्त्री जीवनाची व्यथा वेदना व्यक्त करणारी आहे. तिचे स्त्रीमन आणि स्त्री जीवनाची अनुभूती यांचे स्त्री

जीवनाशी संबंधित प्रतिमा दृष्टीतून वर्णन सहजपणे तिच्या अभंगात येते. दोघींचेही स्थान वारकरी पंथात आपापल्या वेगळेपणाने उठून दिसणारे आहे.

लौकिकार्थाने संत नामदेवांच्या घरी दासी म्हणून काम करणारी जनाबाई शूद्र, अनाथ स्त्री असूनही आपल्या आत्मबळाने देवाशी एकरुप होते. "डोईचा पदर आला खांद्यावर.... जनी म्हणे देवा मी झाले येसवा,॥५ असे स्पष्ट बोलणारी जनाबाई तिची संवेदनशीलता, आत्मपरभावना व स्त्रीमनाची बंडखोरी व्यक्त करते.

**कान्होपात्रा** : वेश्येच्या पोटी जन्माला आलेली कान्होपात्रा आपली अस्मिता जतन करण्यासाठी विठ्ठलचरणी देहत्याग करुन निश्चयीपणा, भक्तिसामर्थ्य व रुढ चाकोरी भेदण्याचे धैर्य दाखविते. कान्होपात्रा कुणाचाही आधार नसताना लौकिक अर्थाने गुरू नसताना अंतप्रेरणेने विकसित झाली. म्हणून तिचे वेगळेपण उठून दिसते.

**बहिणाबाई** : संत बहिणाबाईने प्रपंच व परमार्थाच्या ओढाताणीत अत्यंत जास्त शारीरिक, मानसिक क्लेश भोगले. "विरक्तीचे मूळ प्रपंचाचा त्याग। पाहताचि एक गृह शैल."६ या रचनेतून बहिणाबाईंनी अध्यात्माच्या मार्गावरती जाण्याऱ्या स्त्रीसाठी वैराग्य, विरक्ती या गोष्टी अशक्यप्राय आहेत कारण घर हा पर्वतासारखा मोठा अडथळा त्या भागात आहे असे मांडण्याचे धैर्य दाखविले. 'स्त्रीला अध्यात्ममार्गातील धोंड' मानणाऱ्यांना एका स्त्रीने असे म्हणणे सनातन्यांसाठी चपराक होती. जात ब्राह्मण असून लौकिकार्थाने शूद्र तुकारामांना गुरु करण्यासाठी त्यांना पती व समाजाचा प्रचंड त्रास होऊनही त्या त्यापासून मागे हटल्या नाहीत.

महार चोखामेळाची पत्नी सोयराबाई हिने "विटाळावाचोनी उत्पन्नीचे स्थान। कोण देह निर्माण नाही जगी।"७ असे सांगून निसर्गदत्त देहविटाळाची अपरिहार्यता मांडली व विटाळ कल्पनेतील फोलपणा दाखवून दिला. संत विठाबाई भक्तिमार्गाने आडवे येणाऱ्या पतीला "तुझी सत्ता आहे देहावरी समज। माझेवरी तुझी किंचित नाही."८ असे म्हणून देहाला बंदिस्त ठेवले तरी स्वातंत्र्याची जबरदस्त उर्मी असलेले मन बंदिस्त करता येत नाही असे स्पष्टपणे सांगितले. स्त्रियांची साक्ष न्यायनिवाडा करताना मान्य करण्यात आलेली दिसते.

तारा भवाळकर यांनी या संत स्त्रियांच्या जीवनचरित्रावर व साहित्यरचनांवर प्रकाश टाकला आहे. रामदासी संप्रदायातील बालविधवा वेणाबाईंनी आपल्या बुद्धिमत्ता, धिटाई, भक्ती, गुरुनिष्ठा यामुळे समर्थ रामदासांच्या लाडक्या शिष्येचे स्थान मिळविले.

पुरुषाप्रमाणे स्त्रियांना स्वतःचे निर्णय घेता येत नसत. त्याला 'मनुस्मृती सारख्या ग्रंथाची परंपरा असून समाजजीवनात ती रुजली आहे. स्त्रीला कोणतेच निर्णयस्वातंत्र्य नाही. परमार्थ आणि निवृत्तीचा तिला मुळीच अधिकार नाही. पुरुषाला मात्र हे स्वातंत्र्य असते. स्त्रीने आत्मसन्मानाची वाट स्वतःच्या बळावर शोधणे समाज मान्य करीत नाही याला कारण तिने लाचार आणि परावलंबीच असणे पुरुषसत्ताक समाजपरंपरेसाठी फायद्याचे होते. पतिव्रता, सतीत्व हे स्त्रीजीवनाचे पारंपरिक निकष झुगारून परमेश्वर प्राप्तीसाठी पती, घरातील सुरक्षितता यांचा त्याग करण्याचे अलौकिक धाडस या

स्त्रियांनी दाखविले. तारा भवाळकर या संदर्भात म्हणतात, "स्त्रियांचा वर्ग हा आजवर सर्व जगातील सर्वाधिक उपेक्षित वर्ग आहे. त्यांना ज्ञान आणि उच्चस्तरीय धर्म यांपासून वंचित ठेवण्याचा पध्दतशीर प्रयत्न झाला आहे. परंतु भक्ति आंदोलकांनी स्त्रियांची ही कोंडी फोडली.... ज्या स्त्रियांजवळ लोकोत्तर धैर्य होते, आत्मसन्मानाची तीव्र आकाक्षा होती, त्या स्त्रिया या काळात लोकविलक्षण सामर्थ्य व्यक्त करून गेल्या. त्यांच्या भोवतालच्या कौटुंबिक, सामाजिक, सांस्कृतिक तटबंद्या इतक्या भक्कम होत्या की त्या भेदणे ही सामान्य गोष्ट नव्हती." ९ संतपरंपरेतील स्त्रियांनी लोकापवादाशी दिलेला लढा पाहता वरील विवेचनाची यथार्थता पटते. ग्रंपचाचा त्याग करून पुरुष गुरु केल्यामुळे 'स्वैरिणी' चा शिक्का बसला तरी त्याची पर्वा न करता या स्त्रियांनी आपला भक्तिमार्ग कायम ठेवला. प्रंचड विरोधाचा सामना करून भक्तिसामर्थ्य, आत्मबळ, निष्ठा, आत्मभान यामुळे त्यांना 'स्त्रीमुक्तीचा आत्मस्वर' सापडला असे दिसून येते. प्रस्तुत संत कवयित्रींच्या रचनातून त्यांच्या आत्मसामर्थ्याचा प्रत्यय येतो.

स्त्रीवर प्रचंड बंधने असलेल्या काळात या स्त्रियांनी दाखवलेली अध्यात्मिक क्षेत्रातील बंडखोरी स्त्रीत्वाच्या सामर्थ्याचा प्रत्यय देते. विविध भक्तिसंप्रदायांनी स्त्रीला भक्तीचा अधिकार देऊन अध्यात्मक्षेत्रात स्थान दिले. महानुभावपंथ, वारकरी पंथ, वीरशैव पंथ या विविध पंथात स्त्रीलाही भक्तीचा व मुक्तीचा अधिकार तत्त्वतः मान्य केला तरी सर्वसंग परित्याग करून भक्तिमार्गाची वाटचाल करणाऱ्या स्त्रियांना समाजाचा विरोध झाला. संसारात राहून ईश्वरभक्ती करणाऱ्या स्त्रियांचाही जाच झाला. या सर्वांतून बंडखोरी करून संतपरंपरेत काही स्त्रियांनी महत्त्वाचे स्थान मिळविले. यात विविध श्रेष्ठ-कनिष्ठ जातीच्या दासी, पतिता अशा स्त्रिया असल्या तरी त्यांची संख्या हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच आहे. तळागाळातील स्त्रियांपर्यंत जाऊन तिला विविध प्रथा, रुढीपरंपरांच्या काचातून मुक्त करणारी क्रांती घडलीच नव्हती. सर्वसामान्य स्त्री मुक्तीची वाट पाहतच होती. स्त्रियांना आत्मभान आले ते शिक्षणाचा अधिकार मिळाल्यासच प्रबोधनाचा कालखंड यासाठीच महत्त्वाचा ठरतो. या कालखंडात सुधाराकामुळे शिक्षणास सुरुवात झाली. तिची विविध अमानुष प्रथा, परंपराच्या विळख्यातून हळूहळू मुक्तता होत गेली. स्त्रियांच्या आतापर्यंतच्या वाटचालीत पुढील टप्पा महत्त्वाचा ठरतो.

**निष्कर्ष**

1) संत मुक्ताबाईच्या जगण्यातून व काव्यातून येणारी तिची प्रतिमा ही तडफदार ,स्पष्टवक्त्या 'ज्ञानी' स्त्रीची येते म्हणून की काय तिच्या कवितेतून तत्कालीन सामाजिक संदर्भ येत नाहीत स्त्री जीवनाचे संदर्भ येत नाहीत.
2) दैनंदिन जीवनातील काबाडकष्ट करणाऱ्या संत जनाबाईंची अभिव्यक्ती स्त्री जीवनाची व्यथा वेदना व्यक्त करणारी आहे. तिचे स्त्रीमन आणि स्त्री जीवनाची अनुभूती यांचे स्त्री जीवनाशी संबंधित प्रतिमा दृष्टीतून वर्णन सहजपणे तिच्या अभंगात येते.

3) बहिणाबाईंनी अध्यात्माच्या मार्गावरती जाण्याऱ्या स्त्रीसाठी वैराग्य, विरक्ती या गोष्टी अशक्यप्राय आहेत कारण घर हा पर्वतासारखा मोठा अडथळा त्या भागात आहे असे मांडण्याचे धैर्य दाखविले.
4) सोयराबाई निसर्गदत्त देहविटाळाची अपरिहार्यता मांडली व विटाळ कल्पनेतील फोलपणा दाखवून दिला.
5) संतपरंपरेतील स्त्रियांनी लोकापवादाशी दिलेला लढा पाहता ग्रंपचाचा त्याग करुन पुरुष गुरु केल्यामुळे 'स्वैरिणी' चा शिक्का बसला तरी त्याची पर्वा न करता या स्त्रियांनी आपला भक्तिमार्ग कायम ठेवला. प्रंचड विरोधाचा सामना करुन भक्तिसामर्थ्य, आत्मबळ, निष्ठा, आत्मभान यामुळे त्यांना 'स्त्रीमुक्तीचा आत्मस्वर' सापडला असे दिसून येते.
6) स्त्रीवर प्रचंड बंधने असलेल्या काळात या स्त्रियांनी दाखवलेली अध्यात्मिक क्षेत्रातील बंडखोरी स्त्रीत्वाच्या सामर्थ्याचा प्रत्यय देते.

समारोप

या सर्वच संत कवयित्रींनी मनोनिग्रहाने वारकरी पंथात अध्यात्मिक अधिकार व मानाचे स्थान प्राप्त केले. त्या काळातील पुरुष संतांपेक्षा त्या कुठेच कमी पडल्या नाहीत.उलट त्यांच्या भोवतीच्या पुरुषांना आत्मोद्धारासाठी मदत केली, मार्ग दाखवला ,'स्व 'ला शोधले .आधुनिक स्त्री लिखित साहित्यमागे संत कवयित्रींचा हा प्रगल्भ व संपन्न वारसा आहे आणि हा कणखर आत्मस्वर आजही प्रेरक आहे.

संदर्भ

1. स्त्री मुक्तीचा आत्मस्वर - तारा भवाळकर , प्र. आ. १ मे १९९४, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, पृ.क्र. ३५
2. तत्रैव- पृ.क्र. ३६
3. स्त्री साहित्याचा मागोवा खंड 1 (इसवी सन 1850 ते 1950)- संपा. डॉ. मंदा खांडगे व इतर , संत साहित्य- कल्याणी हर्डीकर ,प्र.आ. डिसेंबर २००२ प्रतिमा प्रकाशन ,पुणे.पृ.8
4. महानुभाव आणि वारकरी साहित्य -प्रा.सुग्राम पुल्ले,प्र. आ. जुलै 2016,सूर्यमुद्रा प्रकाशन, नांदेड. पृष्ठ 116
5. साहित्य : आकलन आणि अन्वयार्थ-डॉ.कीर्तीकुमार मोरे, प्र.आ.१४ जोन.२०१४, प्रतिभास प्रकाशन ,परभणी, पृ.१०२
6. संतांच्या आत्मकथा- रा.चिं. ढेरे, द्वि.आ., १९६९, पुष्पक प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे ३०, पृ.क्र. ८०
7. स्त्रीमुक्तीचा आत्मस्वर- तारा भवाळकर,उनि. पृ.क्र. ४७
8. तत्रैव- पृ.क्र. ५०
9. तत्रैव- पृ.क्र. ४ व ५

**मराठी संत कवयित्री -स्त्रीमुक्तीचा आत्मस्वर**

सहा.प्रा.डॉ. सारिका अशोकराव बुरगे